मंत्रालयस्तरावरील मा.मंत्री व अन्य बैठकांचे कार्यवृत्त तात्काळ निर्गमित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
परिपत्रक क्र.संकीर्ण-२००७/प्र.क्र. २४२/आ (रवका)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० ऑक्टोबर,२०११

| आवक नोंद | |
|---|---|
| अधी.अभि. | |
| सहा.अभि. | |
| प्र.लि. | |
| टेबल | |
| आ.क्र. | |
| दिनांक | |

**- परिपत्रक -**

असे निदर्शनास येते की, ब-याच वेळा मंत्रालयस्तरावरील मा.मंत्री महोदय अथवा अन्य बैठकांचे कार्यवृत्त लवकर तयार अथवा निर्गमित केले जात नाही. त्यामुळे बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीस विलंब होतो. काहीवेळा मा.मंत्री महोदयांकडून याबाबत नाराजी व्यक्त केली जाते. यास्तव, मंत्रालयातील बैठकांचे कार्यवृत्त तयार करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. मंत्रालयात वरिष्ठ स्तरावर आयोजित बैठकीची टिप्पणी, बैठकीपूर्वी समक्ष प्रधान सचिव / सचिव यांना देण्यात यावी, ऐनवेळी बैठकीत टिप्पणी देऊ नये.
२. मंत्रालयात झालेल्या सचिव व त्यावरील दर्जाच्या बैठकांचे कार्यवृत्त शक्यतो त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दोन दिवसांमध्ये तयार करुन सभाध्यक्षांच्या मान्यतेसाठी सादर करावे.
३. सदर कार्यवृत्त तयार करुन घेऊन सभाध्यक्षांना सादर करण्याची कार्यवाही संबंधित कक्ष अधिकारी व अवर सचिव यांनी स्वत: करावी व ती त्यांची जबाबदारी राहील. याबाबत संबंधित उप सचिवांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.
४. ज्या बैठकांमध्ये तांत्रिक बाबींबाबत चर्चा होऊन निर्णय घेतला जातो त्या बैठकांचे कार्यवृत्त आवश्यक असल्यास क्षेत्रिय अधिका-यांनी मंत्रालयात थांबून त्याच दिवशी तयार करुन द्यावे.

यापुढे कोणत्याही बैठकांचे कार्यवृत्त दोन दिवसांत प्रस्तुत न झाल्यास त्याबाबत संबंधित कक्ष अधिकारी व अवर सचिव यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल तसेच त्याची नोंद गोपनीय अभिलेख्यांमध्ये घेण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

( आ. बा. पाटील )
**शासनाचे सह सचिव**

प्रति,
सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
प्रधान सचिव (जसं) / सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक
खाजगी सचिव, मा.मंत्री, जलसंपदा (म.कृ.खो.वगळून) / मा.मंत्री, जलसंपदा (म.कृ.खो.)
खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, जलसंपदा.

अधीक्षक अभियंता,
सं. सं. (वि. गु.)
नाशिक - ४.

उविअ (प्रशा.)
अ.अ. (वि.गु.) यांचे करिता